MHYA210019982024

**आदेश निशाणी क्रमांक १० खाली**

[दिनांक-१७/०३/२०२६]

१] अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदाराचे भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी येथे जमा झालेल्या विम्याचे रक्कमेतून अर्जदारांची थकीत असलेली खावटी रक्कम गोठवून ती अर्जदारांना देण्याबाबत शाखा अधिकारी यांना निर्देश देण्याकरीता दाखल केला आहे.

२] अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी गैरअर्जदाराविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार कायद्यातंर्गत मामला दाखल केला आहे. त्यामध्ये, अर्जदारांनी दाखल केलेल्या अंतरीम खावटी अर्जावर दि.२४/०१/२०२४ रोजी आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानुसार, गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रु.१५,०००/- व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रु.५,०००/- अंतरीम पोटगी मंजुर झाली आहे. आज रोजी गैरअर्जदाराकडे दि.२९/०८/२०२३ ते दि.२८/०२/२०२६ अशा २९ महिन्याची अंतरीम पोटगी रक्कम रु.७,२५,०००/- थकीत आहे. त्यापैकी, गैरअर्जदाराने केवळ रु.३,०००/- चा भरणा केला आहे.

३] अर्जदारांनी गैरअर्जदाराचे पगारातून पोटगी रक्कम कपात करण्यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज मंजुर करण्यात आला होता. अर्जदारांना २ महिने गैरअर्जदाराचे पगारातून रक्कम मिळाली. परंतु, गैरअर्जदाराचा अपघात झाल्यामुळे त्याचा पगार बंद झाला. त्यामुळे, अर्जदारांना गैरअर्जदाराचे पगारातून पोटगी रक्कम मिळाली नाही. अर्जदारांना दैनिक वृत्तपत्रातून असे कळाले की, गैरअर्जदाराचे भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी येथे कॉर्पोरेट सॅलेरी पॅकेज खाते होते. गैरअर्जदाराचा अपघात झाल्यामुळे त्यास रु.५० लाखाचा विमा मंजुर झाला असून त्याची रक्कम त्याचे खात्यात जमा झाली आहे. अर्जदारांनी शाखा व्यवस्थापक यांना अर्ज देवून गैरअर्जदाराचे खात्यामधून थकीत

पोटगी रक्कम गोठवून ती अर्जदारांना देण्याची विनंती केली होती. परंतु, शाखा व्यवस्थापक यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे, अर्जदारांना सदरचा अर्ज दाखल करावा लागला. शेवटी, त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

४] सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदारास नोटीस प्राप्त होवून सुद्धा तो न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे, त्याचेविरुद्ध सदरचे प्रकरण एकतर्फा चालविण्यात येत आहे.

५] अर्जाचे अवलोकन केले. अर्जदारांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद सादर केला. अर्जदारांनी सदरचे अर्जासोबत दि.०७/०३/२०२६ रोजीचे दैनिक यवतमाळ मार्मीक वर्तमान पत्र व शाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक यांना दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदाराचे भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी येथे कॉर्पोरेट सॅलेरी पॅकेज खाते आहे. गैरअर्जदाराचा अपघात झाल्यामुळे त्यास बँकेमार्फत रु.५० लाखाचा अंशतः अपंगत्व विमा दावा मंजुर करण्यात आला आहे. सदर विम्याची रक्कम ही गैरअर्जदाराचे भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी येथील खात्यात जमा आहे.

६] गैरअर्जदाराकडे दि.२९/०८/२०२३ ते दि.२८/०२/२०२६ या कालावधीमधील २९ महिन्यांची एकूण रु.७,२५,०००/- अंतरीम खावटी थकीत आहे. त्यापैकी, गैरअर्जदाराने केवळ रु.३,०००/- चा भरणा केला आहे. त्यानंतर, गैरअर्जदराने अर्जदारांना कोणतीही पोटगी रक्कम दिली नाही. अर्जदारांचा पोटगी रक्कमेवर उदर्निवाह असल्याचे दिसून येते. तसेच, अर्जदार क्र.२ व ३ हे शिक्षण घेत आहेत. त्यांचे शिक्षणाकरीता अर्जदार क्र.१ ला पोटगी रक्कमेची नितांत गरज आहे. गैरअर्जदाराने न्यायालयात हजर राहून अर्जदारांना पोटगी रक्कम दिली नाही. आज रोजी गैरअर्जदारास अंतशः अंपगत्व आल्याचे दिसून येते. सबब, गैरअर्जदराची वर्तणुक व त्याची शारीरीक परिस्थिती पाहता त्याचे खात्यामध्ये जमा असलेल्या विमा रक्कमेपैकी अंतरीम पोटगी रक्कम

रु.७,२२,०००/- गोठवून ती अर्जदारांना देणे उचित ठरते. म्हणून, अर्जदारांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी उपरोक्त विवेंचनेअंती खालील आदेश पारित करीत आहे;

**आदेश**

१] अर्ज मंजुर करण्यात येतो.

२] शाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी गैरअर्जदार संजय विजय पाल याचे खात्यामध्ये जमा असलेल्या विमा रक्कमेपैकी एकूण रु.७,२२,०००/- रक्कम गोठवून ती अर्जदारांना द्यावी.

३] शाखा व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, शाखा-वणी यांना सदर आदेशाची अंमलबजावणी करीता पत्र पाठविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

ठिकाण : वणी
दि.१७/०३/२०२६

**(शहाजी दत्तराव भोसले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.१, वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.